**<u>ठळक बातम्या</u>**

- व्यावसायिक ग्राहकांना आणखी १० टक्के एलपीजी पुरवठा करायला केंद्र सरकारची मंजुरी
- १०० औद्योगिक पार्क विकसित करण्यासाठीच्या ‘भव्य’ योजनेला केंद्र सरकारची मंजुरी
- शुद्धलेखन दुरुस्तीच्या नावाखाली एक ते दीड लाख शेतकऱ्यांची फसवणूक, महसूल विभागातला सर्वात मोठा घोटाळा उघड झाल्याची महसूल मंत्र्यांची माहिती
- दिल्ली आणि इंदूरमध्ये लागलेल्या आगीत १७ जणांचा मृत्यू

**आणि**

- देशात जबाबदार, पारदर्शक आणि विश्वासार्ह जाहिरात व्यवस्थेची गरज माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या सचिवांकडून व्यक्त

**<><><><><>**

व्यावसायिक ग्राहकांना आणखी १० टक्के एलपीजी पुरवठा करायला केंद्र सरकारनं आज मंजुरी दिली. त्यामुळं या ग्राहकांना आता मासिक वापराच्या सरासरीच्या ३० टक्के एलपीजी मिळेल. अधिकाधिक व्यावसायिक ग्राहकांनी एलपीजी ऐवजी पाइप गॅसचा वापर करावा यासाठी प्रयत्न करण्याचं आवाहन पेट्रोलियम सचिवांनी सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहून केलं आहे.

**<><><><><>**

केंद्रीय मंत्रिमंडळानं आज १०० औद्योगिक पार्क विकसित करण्यासाठी भारत औद्योगिक विकास योजना ‘भव्य’ला मंजुरी दिली. यासाठी ३३ हजार ६६० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर नवी दिल्लीत माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही माहिती दिली.

**होल्ड- बाईट- अश्विनी वैष्णव**

उद्योग क्षेत्रात जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा विकसित करणं, उत्पादन क्षमतेला चालना देणं, हा या योजनेचा उद्देश आहे. याशिवाय २०२६ ते २०३१ या कालावधीसाठी लघु जलविद्युत प्रकल्प विकास योजनेलाही मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. या योजनेअंतर्गत

पंधराशे मेगावॅट क्षमतेचे लघुप्रकल्प उभारण्यासाठी २ हजार ५८४ कोटी रुपयांपेक्षा जास्त निधीची तरतूद केली आहे.

केंद्रीय आर्थिक व्यवहार विषयक मंत्रिमंडळ समितीनं आज २०२३-२४च्या कापूस हंगामासाठी भारतीय कापूस महामंडळाला १ हजार ७१८ कोटी रुपयांच्या किमान आधारभूत किंमत निधीला मंजुरी दिली. २०२३-२४ च्या कापूस हंगामामध्ये ११४ लाख ४७ हजार हेक्टर क्षेत्र लागवडीखाली असण्याचा, आणि ३ कोटी २५ लाख २२ हजार गाठी इतकं उत्पादन होण्याचा अंदाज व्यकेत केला होता.

**<><><><>**

देशातल्या शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणं, अन्नसुरक्षा सुनिश्चित करणे आणि नागरिकांना पौष्टिक अन्न उपलब्ध करून देणं हे केंद्र सरकारचं ध्येय असून ते गाठण्यासाठी आवश्यक त्या उपाय योजना आखल्या असून त्या राबवल्या जात असल्याचं केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज सांगितलं. लोकसभेत कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय मागण्यांवरच्या चर्चेला ते उत्तर देत होते. कृषी उत्पादन वाढीसाठी केलेल्या प्रयत्नांमुळे अन्नधान्य आणि बागायती उत्पादनात विक्रमी वाढ झाली. तांदूळ उत्पादनात भारतानं चीनला मागं टाकल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

लोकसभेनं आज विनियोजन विधेयक २०२६ क्रमांक २ मंजूर केलं. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी हे विधेयक मांडलं होतं. लोकसभेनं विविध मंत्रालयांच्या अनुदानाच्या मागण्याही चर्चेविना मंजूर केल्या. या मंत्रालयांमध्ये गृह, संरक्षण, परराष्ट्र व्यवहार, ऊर्जा, माहिती आणि प्रसारण, ग्राहक व्यवहार, आरोग्य, आणि नागरी विमान वाहतूक यांचा समावेश आहे. विरोधी सदस्यांनी मांडलेले कपातीचे प्रस्ताव सभागृहानं आवाजी मतदानानं फेटाळले.

त्यानंतर, सभागृहाचं कामकाज दिवसासाठी तहकूब करण्यात आलं. आता सोमवारी कामकाज पुन्हा सुरू होईल.

**<><><><>**

राजकारणात सक्रीय असलेल्या व्यक्तींच्या आयुष्यात कधीच पूर्णविराम नसतो, त्यामुळे कार्यकाळ संपल्यानं राज्यसभेतून निवृत्त होणाऱ्या सदस्यांनीही यापुढेही देशहितासाठी कार्यरत रहावं, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं.

राज्यसभेतून निवृत्त होणाऱ्या ५९ सदस्यांना आज निरोप देण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. राज्यसभेचे उपसभापती हरिवंश यांनी दिलेलं योगदान वाखाण्याजोगं असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. राज्यसभेचे अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन, विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे आणि इतर मान्यवरांनीही या सर्वांना शुभेच्छा दिल्या.

<><><><>

शुद्धलेखन दुरुस्तीच्या नावाखाली एक ते दीड लाख शेतकऱ्यांची फसवणूक महसूल खात्याच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी केली आहे. राज्याच्या महसूल खात्यातला हा आतापर्यंतचा सर्वात मोठा घोटाळा असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधान परिषदेत दिली. महसूल विभागाच्या कलम १५५चा गैरवापर करून सातबारा उताऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर फेरफार झाले. काही ठिकाणी बेकायदेशीररित्या जमीन हस्तांतरणही करण्यात आल्याची माहिती बावनकुळे यांनी दिली आहे.

<><><><>

दिल्लीत पालम परिसरातल्या एका बहुमजली इमारतीला आग लागल्यामुळे ९ जणांचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेत ३ जण जखमी झाले आहेत.

मध्य प्रदेशात इंदूर इथे आज पहाटे इलेक्ट्रिक कार चार्जिंग पॉईंटचा स्फोट झाल्यामुळे लागलेल्या आगीत एकाच घरातल्या ८ जणांचा मृत्यू झाला. चार्जिंग पॉईंट ज्या घराजवळ होता, त्या घरातल्या गॅस सिलिंडरचाही स्फोट झाल्यामुळे आग आणखी भडकली. या आगीतून तीन जणांना वाचवण्यात यश आलं असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

या दोन्ही दुर्घटनांबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केलं असून प्रधानमंत्री राष्ट्रीय मदतनिधीतून मृतांच्या कुटुंबाला प्रत्येकी २ लाख रुपये तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांच्या आर्थिक मदतीची घोषणा केली आहे.

<><><><>

देशात जबाबदार, पारदर्शक आणि विश्वासार्ह जाहिरात व्यवस्थेची गरज माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी व्यक्त केली आहे. Advertisement Standard Council of India नं मुंबईत आयोजित परिषदेत ते बोलत होते.

- **- - होल्ड - जाजू बाइट - - -**

जाजू यांनी डिजिटल जाहिरातींशी संबंधित धोके देखील अधोरेखित केले. यामध्ये आर्थिक फसवणूक, दिशाभूल करणाऱ्या गुंतवणूक संदर्भातल्या जाहिराती आणि बनावट नोकरीच्या ऑफर्स यांचा समावेश असल्याचा उल्लेख त्यांनी केला. व्यावसायिक अभिव्यक्ती ही अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा एक भाग असली तरी, दिशाभूल करणाऱ्या आणि फसव्या जाहिरातींवर नियंत्रण ठेवलं जाऊ शकते आणि ठेवलं पाहिजे, हे त्यांनी अधोरेखित केलं. दुपारी जाजू यांनी इंडियन इन्स्टिटयूट ऑफ क्रिएटिव्ह टेकनॉलॉजी या संस्थेला भेट देऊन कामकाजाचा आढावा घेतला.

**<><><><><>**

देशातल्या शेअर बाजारात सुरू असलेली तेजी आज सलग तिसऱ्या दिवशी कायम राहिली. दिवसअखेर सेन्सेक्स ६३३ अंकांची वाढ नोंदवून ७६ हजार ७०४ अंकांवर बंद झाला. निफ्टी १९७ अंकांनी वधारुन २३ हजार ७७८ अंकांवर स्थिरावला. सत्रादरम्यान दोन्ही निर्देशांकांनी यापेक्षा मोठी वाढ नोंदवली होती. इराण, इस्त्राइल आणि अमेरिका युद्धामुळं झालेल्या घसरणीचा लाभ उठवत गुंतवणूकदारांनी खरेदी केल्यानं ही तेजी दिसून येते आहे, असं विश्लेषकांचं मत आहे.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमध्ये होणाऱ्या आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगानं मोठ्या प्रमाणात प्रशासकीय तसंच पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या ११ जिल्हाधिकाऱ्यांना पदावरून दूर केलं आहे. तर कूच, बिहार, जलपाईगुडी, मालदा, मुर्शिदाबाद, नादिया तसंच उत्तर आणि दक्षिण २४ परगणा जिल्ह्यांतील अधिकाऱ्यांची बदल्या केल्या आहेत. हे आदेश तात्काळ लागू करण्याच्या सूचनाही निवडणूक आयोगानं दिल्या आहेत.

**<><><><><>**

इराणच्या गुप्तचर विभागाचे मंत्री इस्माईल खतीब यांचा खातमा केल्याचा दावा इस्त्रायलच्या संरक्षण मंत्र्यांनी केला आहे. आज दिवसभर विविध आघाड्यांवर जोरदार हल्ले होण्याची शक्यता त्यांनी वर्तवली, मात्र याबाबतचे कोणतेही तपशील त्यांनी दिले नाहीत. इराणचे सर्वोच्च सुरक्षा अधिकारी अली लारीजानी आणि बासिज अर्धसैनिक दलाचे प्रमुख गुलामरेजा  सुलेमानी यांची कालच हत्या झाली होती.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी उद्याच्या गुढीपाडव्यानिमित्त जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. गुढीपाड्व्याप्रमाणेच त्यांनी चैत्र शुक्लादि, उगादी, चेटी चंद, नवरोज, साजिबू चेइराओबा या सणांच्याही शुभेच्छा दिल्या आहेत.

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी गुढी पाडवा तसंच नूतन वर्षानिमित्त राज्यातल्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. गुढी पाडव्याचं मंगल पर्व तसंच आगामी वर्ष सर्वांच्या जीवनात उत्तम आरोग्य, सुख, समाधान आणि समृद्धी घेऊन येवो अशा शब्दात त्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

//<><><><><>//